## पुणे महानगरपालिका

# माननीय श्री. अरुण दाते यांना

# मानपत्र

सप्रेम नमस्कार,

रसिकाग्रणी रामूभय्या दाते हे आपले पिताजी. इंदूरला ४ मे १९३४ रोजी रामूभय्यांच्या ऐश्वर्यसंपन्न घरात आपला जन्म झाला. आपल्या प्रसादतुल्य घरातले वैभव म्हणजे तेथे नित्य चालणाऱ्या संगीताच्या व कवि-साहित्यिकांच्या काव्य-शास्त्र-विनोदाच्या मैफली. भारतातील सर्व नामवंत कलावंतांनी आपल्या घरी हजेरी लावलेली आहे. वडिलांची रसिकता, त्यांचे औदार्य, थोरामोठ्यांचा सहवास यांचे सुरेल संस्कार आपल्यावर झाले. साहित्य, संगीत आणि संस्कृतीमधले उत्कृष्ट आपल्याला अनुभवण्यास, ऐकण्यास, पाहण्यास मिळाले.

एकदा सहज गझल गुणगुणताना आपल्याला ऐकल्यावर, कुमार गंधर्वांनी बेहजाद लखनवीची एक गझल आपल्याला शिकवली, ती ऐकून पु. ल. देशपांडे यांनी आपल्यातल्या गायकाला अचूक ओळखले आणि आपल्या वडिलांसमोर गायला लावले होते. हा केवळ योगायोग नव्हता. यातून प्रेरणा घेऊन आपण गाण्याचा ध्यास घेतलात. 'मेहनत, नियमित रियाज आणि योग्य गुरूचे मार्गदर्शन यांच्या साह्याने यशाची वाट निश्चित लाभेल', हा गुरुमंत्र वडिलांनी दिला, तो आपण लक्षात ठेवलात. गायनशैलींचे सर्व प्रकार अवगत असलेले के. महावीर यांच्यासारखे उत्कृष्ट शिक्षक आपल्याला लाभले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुंबईच्या व्ही. जे. टी. आय्. मध्ये एकीकडे टेक्स्टाईल इंजिनीयरींगच्या डिग्रीचा अभ्यास तर दुसरीकडे गाण्याचा रियाज चालू ठेवलात. वांद्र्यापासून कुलाब्यापर्यंतच्या बस प्रवासात, तर वडाळ्याच्या बागेत बसून महावीरांनी आपल्याला गाण्याचे पाठ दिले. आकाशवाणीची हिंदी गाण्याची ऑडीशन आणि बी. टेक्स्टाईलची पदवी एकाच वेळी आपल्या पदरात पडली. रेडिओवर हिंदी गाणी, उर्दू गझल आपण गाऊ लागलात आणि प्रसिद्ध कंपनीत रुजू झालात. योशिदासारख्या जपानी गुरुंनी तंत्रज्ञानाची उच्च विद्या आपल्याला दिली. टेक्स्टाईलमधले उत्कृष्ट आधुनिक तंत्रज्ञान आपण आत्मसात केले. त्याचबरोबर श्रीनिवास खळे हे ज्येष्ठ संगीतकार मंगेश पाडगांवकरांनी लिहिलेले 'शुक्रतारा मंदवारा' सारखं अप्रतिम गीत घेऊन आले. ते जणू केवळ आपल्यासाठी तयार केलं होतं. सुधा मल्होत्रांबरोबर आपण गायलेल्या या युगल गीताने इतिहास घडवला. ते साल होतं १९६३. त्यानंतर आपण कधीही मागे वळून पाहिलं नाही. अरुणराव, मराठी भावगीत गायनाने आपण श्रोत्यांना गेली तीस वर्षे रिझवीत आहात. मराठीतल्या नामवंत कवींच्या रचना गाऊन मराठी भावगीत गायनाची वैभवशाली परंपरा आपण जपली आहे.

नोकरीत चढत्या कमानीची प्रगती तर इकडे उत्कृष्ट मराठी भावगीतं आपण गात राहिलात. अरविंद रामचंद्र दाते यांचे नामकरण यशवंत देवांनी नकळता अरुण दाते असं केलं आणि मराठी भावगीतांत एक सोनेरी नाव दाखल झालं. 'सखी शेजारिणी', 'मान वेळावुनी धुंद', 'दिवस तुझे हे फुलायचे', 'भातुकलीच्या खेळामधली', 'डोळ्यांत सांजवेळी', 'स्वरगंगेच्या काठावरती', अशी कितीतरी गाणी वानगीदाखल सांगता येतील. उत्कृष्ट काव्याला उत्कट चाली मिळाल्या आणि ती गाऊन त्यांचे सार्थक केले.

नोकरीत सर्वोच्च पदावर पोहोचलेले असताना व टेक्स्टाईलच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ म्हणून ख्याती मिळवलेली असताना, एका क्षणी आपण फक्त गाण्याला आयुष्य वाहून घेण्याचे ठरवले आणि नोकरीकडे पाठ फिरवून मुक्त झालात. आजवर अविश्रांतपणे मराठी कविता गाण्याचे व्रत आपण जपत आहात आणि फक्त स्वतःची गाणी म्हणण्याचा वैशिष्ट्यपूर्ण परिपाठ आपण ठेवला आहे.

आजपर्यंत कुसुमाग्रज, वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, वा. रा. कांत, ग्रेस, सौमित्र, शंकर वैद्य, शांताराम नांदगांवकर, गंगाधर महांबरे, प्रवीण दवणे यांच्यासारख्या नव्या-जुन्या कवींची गाणी व श्रीनिवास खळे, यशवंत देव, वसंत प्रभु, राम कदम, हृदयनाथ मंगेशकर, के. महावीर, रवि दाते, मिलींद इंगळे अशा संगीतकारांच्या रचना आपण गायल्या आहेत.

उर्दूचे आपण जाणकार आहात. गझल गायकीतही आपला हातखंडा आहे. मराठी माणसांच्या वस्तीत जगाच्या पाठीवर प्रत्येक ठिकाणी आपण गाण्याचे कार्यक्रम केले आहेत. इंग्लंड, अमेरिका, दुबई, इराण, मॉरिशस, शारजा, मस्कतमध्ये आपण भावगीतं गायली आहेत.

१९९३ साली अमेरिकेत ५९ दिवसांत ३३ झंझावाती कार्यक्रम करून आपण विक्रमच केला आहे. 'ओक्लाहामा' या शहराच्या महापौरांनी आपल्याला सन्माननीय नागरिकत्व बहाल केले आहे. गेल्या तीस वर्षांत आपण अठराशेहून अधिक कार्यक्रम केले आहेत.

'शुक्रतारा' या नावाने प्रसिद्ध असलेल्या कार्यक्रमात आपल्या गाण्यांबरोबरच आकर्षक शैलीतला श्रोत्यांशी संवाद हे प्रमुख आकर्षण आहे. दहा लाखाच्यावर खपलेल्या ध्वनिफीती हे आपल्या लोकप्रियतेच्या निदर्शक आहेत.

केवळ उत्कृष्ट मराठी भावगीत गाण्याचा वसा घेऊन श्रोत्यांना आपण जो भरभरून आनंद दिलात, त्याबद्दल श्रोत्यांना कृतज्ञता व्यक्त करावीशी वाटते. आपल्या चाहत्यांना जे प्रेम व्यक्त करावेसे वाटते ते या मानपत्रातून प्रतिबिंबित होत आहे.

आजचा दिवस आपला साठाव्या वाढदिवसाचा आहे. आपल्याला श्रोत्यांचे प्रेम लाभो, दीर्घ सुरेल निरामय आयुष्य लाभो या शुभेच्छांसह या मानपत्राचा स्वीकार करावा, ही विनंती.

कळावे.

आपला,

**अली सोमजी**

महापौर, पुणे.

पुणे.

दि. ४ मे, १९९४